‘ई पुस्तकांनी क्रांतिकारी बदल होतील’

**पुणे, १४ नोव्हेंबर/प्रतिनिधी**

देशातील नवी युवा पिढी ही इंटरनेट या माध्यमाशी सुपरिचित असेल, असे प्रतिपादन संगणकतज्ज्ञ धनंजय दातार यांनी केले. अमरधारा, राजहंस प्रकाशन आणि मांडके हिअरिंग सर्व्हिसेस यांच्या वतीने ३८० व्या माय मराठी शब्दोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये आज ‘ई बुक्स आणि वाचन संस्कृती’ या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये लेखक डॉ. अच्युत गोडबोले, संगणकतज्ज्ञ डॉ. दीपक शिकारपूर यांचा सहभाग होता.

या वेळी दातार म्हणाले, ‘भारतामध्ये संगणक वापराचे प्रमाण लहान मुलांमध्ये वाढत आहे. इंटरनेट, गेम या गोष्टी ते सहज हाताळू शकतात. त्यामुळे देशातील येणारी नवी युवा पिढी इंटरनेट या माध्यमाशी सुपरिचित असतील व हाच ई पुस्तकांचा वाचकवर्ग असेल’, असे ते म्हणाले. ग्रामीण भागातील मुलांमध्येदेखील संगणक साक्षरतेचे प्रमाण वाढत आहे. ई पुस्तक स्वस्त दरात बाजारपेठेत उपलब्ध होईल, तेव्हा याचा वापर सर्रास होईल. त्यांनी ई पुस्तकातील सुविधांबद्दल भाष्य केले. ते म्हणाले, ‘पुस्तकातील शब्दाचा अर्थ लगेच शब्दकोशात पाहता येणे, अक्षराचा आकार कमीजास्त करता येणे, या प्रकारच्या सुविधा यामध्ये असतात.’

लेखक व संगणकतज्ज्ञ अच्युत गोडबोले यांनी छपाई तंत्राचा इतिहास, त्याच्यात होत गेलेला विकास आणि लोकांना झालेली छपाई पुस्तकाच्या वाचनाची सवय याबद्दल भाष्य केले. ई पुस्तकाच्या वापराने शैक्षणिक, साहित्यिक क्षेत्रात क्रांतिकारी बदल होतील, असे त्यांनी सांगितले. डॉ. दीपक शिकारपूर यांनी ई पुस्तकाच्या बाबतीत होणारे संशोधन आपल्या मनोगतातून मांडले. यानंतर प्रश्नोत्तराचे सत्र झाले. दातार यांनी ई पुस्तकाचे प्रात्यक्षिक सादर केले. या चर्चासत्राचे सूत्रसंचालन डॉ. कल्याणी मांडके यांनी केले.